# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,
जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेस नोट :- ४३४/२०२३ दिनांक – १२/१२/२०२३

## २० लाख रुपये किंमतीचे एम.डी.(मॅफेड्रॉन) या अंमली पदार्थासह आरोपीना अटक विरार पोलीस ठाणे - गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगीरी

विरार पोलीस ठाणे हद्दीत दिनांक २१/१२/२०२३ रोजी १४.४५वा.चे सुमारास मोहक सिटी जवळ, मनवेलपाडा, विरार(पु.), ता.वसई येथे दोन इसम एम.डी. (मॅथेडॉन) नावचा अंमली पदार्थ विक्री करण्याकरीता येणार असल्याची खात्रीशिर बातमी विरार पोलीस ठाणेच्या गुन्हे प्रकटीकरण पथकास मिळाल्याने, सदर बातमीचे आधारे मिळालेले बातमीचा आशय मा.वरिष्ठांना कळवुन,वरिष्ठांनी दिलेल्या मार्गदर्शक सुचना व आदेशान्वये लागलीच सदर ठिकाणी सापळा रचुन आरोपीतांना शिताफिने ताब्यात घेतले. सदर आरोपीत यांनी त्यांची नावे- **१)मोहमद इशाक शेख, वय-३४ वर्षे, २)मोहमद मोईनुद्दीन शेख, वय-२५ वर्षे**, रा.धारावी, मुंबई असे सांगितले. नमुद आरोपीताची अंगझडती घेतली असता, त्यांचे कब्जात **९७ ग्रॅम वजनाचा एकुण-१९,४०,०००/- रुपये किंमतीचा एम.डी. (मॅफेड्रॉन) नावाचा अंमली पदार्थ,** वजनकाटा, एक बुलेट मोटर सायकल असा **एकुण-२०,९०,६३०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल** मिळुन आल्याने, तो जप्त करण्यात आला आहे. सदर घटनेच्या अनुषंगाने विरार पोलीस ठाणे गु.रजि.नं. II ११६२/२०२३, गुंगीकारक औषधीद्रव्य आणि मनोव्यापार परिणाम करणारे पदार्थ (NDPS) अधिनियम-१९८५ चे कलम-८(क), २१(क), २९ प्रमाणे दि.२१/१२/२०२३ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्री.सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ-३, श्री.रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त सो, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली विरार पोलीस ठाणेचे श्री.राजेंद्र कांबळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो, श्री.अभिजित मडके, पोलीस निरीक्षक (गुन्हे), व गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पो.उप.निरी. ज्ञानेश्वर कोकाटे, पो.हवा. सचिन लोखंडे, विशाल लोहार, संदिप शेरमाळे, योगेश नागरे, पो.अं.संदिप शेळके, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, प्रफुल सोनार यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.




-----ooo-----